Email ID : rdc.palghar-mh@gov.in

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

वाचले :-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) दिनांक १७/०५/२०२१ पासून पालघर जिल्हयातील किनारपट्टीस धडकलेले तौत्के चक्रीवादळ.

क्रं.जि.आ.व्य.पालघर/तौत्के चक्रीवादळ/आदेश/कावि-४४४/२१ दि.१८/०५/२०२१

**आदेश**

ज्याअर्थी, अरबी समुद्रात निर्माण झालेल्या **"तौत्के"** या चक्रीवादळामुळे पालघर जिल्हयात दिनांक १७/०५/२०२१ रोजी अतिमुसळधार पाऊस पडलेला आहे. सदरच्या चक्रीवादळाच्या प्रभावाने जिल्हयात घर, गोठे, शेड, झाडे, विद्युत खांब, सार्वजनिक इमारती इ. चे छत उडून जाणे, तुटणे व इतर अनुषंगिक बाबींचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. **"तौत्के"** या चक्रीवादळाचा ओघ कमी झाल्यावर वरील बाबींची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर दुरुस्ती कामी आवश्यक साहित्य उपलब्ध होणारे दुकाने सुरु करण्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी, मी **डॉ माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये **पालघर जिल्हयातील इलेक्ट्रीकल व हार्डवेअरची दुकाने व ज्या दुकांनामध्ये ताडपत्री, खिळे, प्लॅस्टिक कागद, बांबु, कुऱ्हाड, विद्युत उपकरणे तसेच वरील बाबी दुरुस्ती कामी आवश्यक साहित्य असणारी इतर अनुषंगिक दुकाने दिनांक १८/०५/२०२१ ते दिनांक २१/०५/२०२१ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.**

सदरचा आदेश आज दि.१८/०५/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

(डॉ माणिक गुरसळ)
**जिल्हादंडाधिकारी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

प्रत:-

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

४) पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही.

६) उपविभागीय अधिकारी (सर्व) .............. जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

७) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

८) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

९) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)................ जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

१०) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

११) गट विकास अधिकारी, पं.स. (सर्व) ................ जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही व ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्दीकरिता.

१४) मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व) ................ जि. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही व प्रसिध्दीकरिता.

१५) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.